ePaper
# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार? अजितदादांच्या फोनमुळे चर्चेला उधाण

| वर्ष - 9 | अंक -103 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- विशाखापट्टणममध्ये 'यशस्वी' विजय!
- ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात 511 धावा
- विमान प्रवाशांना मिळणार दिलासा
- शेख हसीना किती काळ राहणार?


www.mahaenews.com | रविवार, दि. 7 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## फडणवीस-शिंदे मतभेद उफाळले? नाशिक वृक्षतोडीवरून महायुतीत तापलेलं वातावरण

# महायुतीत पुन्हा वादाची ठिणगी!

## कुंभमेळा तयारी विरुद्ध पर्यावरण संरक्षण – शिंदे सेनेची भाजपला खुली टक्कर, विरोधकांचा आक्रमक पवित्रा

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**नाशिकच्या तपोवन परिसरात कुंभमेळ्याच्या तयारीसाठी १,८२५ झाडे तोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आणि हा मुद्दा थेट राज्याच्या सत्तासंघर्षात पोहोचला. स्वतः महायुतीतील घटकपक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाने चक्क रस्त्यावर उतरून या वृक्षतोडीला कडाडून विरोध नोंदवला. त्यामुळे भाजप-शिंदेसेना नात्यामधील दुरावा पुन्हा अधोरेखित झाला आहे.**

गोदावरी नदीकिनाऱ्यावर वसलेल्या नाशिकमध्ये २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा पार पडणार आहे. देशभरातून लाखो साधू-संत, भक्त, पर्यटक येणार असल्याने साधूग्राम, निवासी सुविधा, प्रशासनिक नियोजनाची मोठ्या प्रमाणात तयारी सुरू आहे. त्यासाठी ३५ एकर जागेवर बांधकामे होणार असल्याने तेथील झाडे तोडण्यास मनपा व राज्य प्रशासनाने गती दिली. मात्र हीच गती आता सरकारला राजकीय अडचणीत आणताना दिसते.



**फडणवीसांचा ठाम पवित्रा – "झाडे न तोडली तर साधुग्राम कुठे?"**

मागील दोन दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले होते की, "तपोवनात जागा उपलब्ध करण्यासाठी काही प्रमाणात वृक्षतोड अपरिहार्य आहे. साधुग्राम उभारायचा असेल तर झाडे न तोडता जागा तयार कशी होणार?" असे सवाल त्यांनी पर्यावरणप्रेमी व आंदोलनकर्त्यांना उद्देशून विचारले होते.

फडणवीस यांच्या या विधानानंतर विरोधकांनी सरकारवर "पर्यावरणविरोधी" शिक्कामोर्तब केले. पण अनपेक्षित घडामोड म्हणजे, त्याच महायुतीतील शिंदेसेनेने सरकारच्या भूमिकेला खुला विरोध केला आणि भाजपच्या अडचणी वाढल्या.

**शिंदे सेनेची भाजपविरोधी चळवळ?**

नाशिकमध्ये शेकडो कार्यकर्ते तपोवन परिसरात जमले. हातात 'वृक्षतोड बंद करा' अशी फलकं, तर दुसऱ्या हातात करवत-कुऱ्हाडी जाळण्याचा निषेध – ही शिंदे सेनेची प्रत्यक्ष ॲक्शन सरकारला धक्का देणारीच होती. पर्यावरण रक्षणाचा मुद्दा घेऊन शिंदे गटाचे नेते अजय बोरस्ते यांनी प्रशासनाला संशयास्पद भूमिका घेत असल्याचा आरोप केला.

त्यांनी स्पष्ट सांगितले – "झाडेच राहिली नाहीत तर कुंभमेळा कोणासाठी? साधू-संतांना सावली देणारी ही झाडे आहेत. हा विषय उपमुख्यमंत्र्यांच्या (एकनाथ शिंदे) कानावर आम्ही जोरदार टाकणार आहोत." यावेळी कार्यकर्त्यांनी झाडांना राख्या बांधून "आमचे हिरवे भाऊ" असे संबोधत प्रतीकात्मक रक्षण केले. ही दृश्ये सरकारसाठी अधिकच संतापजनक ठरली.

### नाशिक तपोवन परिसरातील १,८२५ झाडांच्या तोडीला शिंदे सेनेचा विरोध

### 'वृक्षतोड थांबवा अन्यथा तीव्र परिणाम' – शिंदे सेनेचा इशारा

### कुंभमेळा सुविधा की हिरवी चादर? निर्णयावरून सरकार कोंडीत

## महायुती सरकारला आता फक्त दोन पर्याय

हिरवाई वाचवून विकासाचे रास्त उत्तर देणे निर्णयावर ठाम राहून राजकीय धक्का सहन करीत पुढे जाणे. नाशिक तपोवनातील १,८२५ झाडांचे भवितव्य काय, आणि महायुतीचे भवितव्य त्याच झाडांवर अडकणार का? काही दिवसांतच याचे उत्तर मिळेल... पण महायुतीतील वादाची ठिणगी पेटली आहे हे नक्की!

विरोधक आक्रमक – सरकार घेरलं पर्यावरणाच्या मुद्द्यावर मुळातच ठाकरे गट, मनसे, काँग्रेस आणि स्थानिक पर्यावरणवादी संघटना या विषयावर तीव्र विरोध दर्शवत आहेत. अभिनेते सयाजी शिंदे यांच्यासह अनेक कलाकारही मैदानात उतरले. अजित पवार यांनी अप्रत्यक्ष समर्थन देत म्हटले – "पर्यावरण राहिले तरच पुढची पिढी राहील."

**विरोधकांचा सरकारला थेट इशारा –**

निर्णय मागे घेतला नाही तर आंदोलन आणखी तीव्र होणार

स्थानिकांचा सहभाग वाढत असल्याने असंतोष भडकण्याची शक्यता

शिंदे सेनेच्या उतरंडीनंतर हा मुद्दा आता "शासन-विरोधाचा" एकत्रित आवाज बनला आहे.

कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांचे स्पष्टीकरण

सरकारवर झालेले तिहेरी दबाव पाहता कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी तातडीने भूमिका मांडली. त्यांनी आश्वासन दिले –

जितकी झाडे तोडली जातील, त्या प्रत्येकावर दहा झाडांची लागवड

झाडांच्या निगेसाठी स्वतंत्र यंत्रणा

शक्य तेथे झाडे वाचवण्याचा प्रयत्न

मनपा प्रशासनाने १५,००० खड्डे खणण्यास सुरुवातही केली आहे. पण आंदोलक या आश्वासनांवर विश्वास ठेवण्यास तयार नाहीत. कारण प्रश्न झाडे वाचवण्याचा आहे की झाडांच्या बदल्यात पर्यावरणाचा सौदा करण्याचा?

**महायुतीतील वाद वाढणार? राजकीय गणिते बदलण्याची शक्यता**

राज्यातील सत्तानाटक बऱ्याचदा दिसलं आहे – परंतु आपलेच सहकारी खुलेपणाने हाताबाहेर गेले तर सत्तास्थैर्याला धोका निर्माण होतो. नाशिक हे शिंदे गटाचे मजबूत राजकीय केंद्र मानले जाते. तेव्हा स्थानिक नाराजीला शिंदे गटाने दाबून ठेवण्याऐवजी सरकारविरोधी पवित्रा घेतल्याने भाजपमध्ये चिंतेची लकेर.

**तीन महत्त्वाच्या बाबी उघड**

शिंदे गट लोकभावनेसोबत उभा राहण्याचा प्रयत्न करतोय

भाजपचा 'विकास' पवित्रा विरुद्ध शिंदे गटाचा 'पर्यावरण' पवित्रा

महायुतीतील ताणतणाव प्रत्यक्ष कृतीतून दिसू लागला आहे

संताप कायम, गर्दी, वादविवाद

प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला

# पुण्यातून 'इंडिगो'ची 42 उड्डाणे रद्द

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे विमानतळावरून 'इंडिगो'ने शनिवारी ४२ विमानांची सेवा रद्द केली. त्यामध्ये विविध राज्यांत जाणाऱ्या २८ आणि येणाऱ्या १४ विमानांचा समावेश होता. आयत्या वेळी विमाने रद्द होत असल्याने प्रवाशांना विमानतळावर ताटकळत बसावे लागले. दरम्यान, पुणे विमानतळावर अकासा एअरलाइन्स, स्पाइस जेट, एअर इंडिया आदी कंपन्यांची उड्डाणे वेळेत सुरू असल्याचे विमानतळ प्रशासनाकडून सांगण्यात आले.**

## इतर कंपन्यांची उड्डाणे सुरळीत




नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डीजीसीए) सूचनांनुसार इंडिगो कंपनीने पुणे विमानतळावरून दिवसभरात रद्द झालेल्या विमानांची यादी अगोदरच जाहीर केली. तसेच, प्रवाशांचे तिकीट शुल्क थेट बँक खात्यात ऑनलाइन पाठविण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. रद्द झालेल्या विमानसेवेबद्दल परिपत्रक काढून कंपनीने खेद व्यक्त केला. बँकॉकसह दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, लखनौ, गोवा, बेंगळुरू, तिरुअनंतपुरम, नागपूर, वाराणसी, चेन्नई, अमृतसर, अहमदाबाद या ठिकाणी जाणारी इंडिगोची विमाने रद्द झाली. त्याचबरोबर इतर राज्यांतून पुण्यात येणारी सात विमाने रद्द झाल्याचे कंपनीकडून जाहीर करण्यात आले. दिवसभरात इंडिगोच्या सात विमानांची उड्डाणे विलंबाने झाली. त्यामुळे विमानतळावर प्रवाशांची गर्दी कायम होती. आठ ते दहा तासांच्या विलंबामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. तिकिटाचा शुल्कपरतावा मिळविण्यासाठीही प्रवाशांनी गर्दी केली. अनेक प्रवाशांचे विमान कंपनीच्या कर्मचाऱ्यांशी वाद झडले. इंडिगो कंपनीची विमानसेवा कोलमडून पडल्याने प्रवासी सेवा विस्कळीत झाली असून, प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक प्रवाशांकडून समाज माध्यमांवर छायाचित्रे, चित्रफिती टाकून प्रवाशांचे हाल दाखविण्यात येत आहेत. पुण्यातील काही प्रवाशांनी, 'केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विमानतळावर येऊन पाहणी करावी,' अशी मागणी केली. इंडिगो कंपनीच्या गैरव्यवस्थापनामुळे देशातील विमानसेवेला मोठा फटका बसला आहे. अनेक प्रवाशांचे मोठे नुकसान होत आहे. मात्र, ज्या प्रवाशांना नियोजित ठिकाणी पोहोचायचेच आहे, अशा प्रवाशांनी इतर विमान कंपन्यांची सेवा घेतल्यास, अशा कंपन्यांनी तिकीट शुल्क वाढवू नये.

### परताव्यासाठी प्रवाशांनी गर्दी

प्रवाशांचे विमान कंपनीच्या कर्मचाऱ्यांशी वाद झडले. इंडिगो कंपनीची विमानसेवा कोलमडून पडल्याने प्रवासी सेवा विस्कळीत झाली असून, प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. अनेक प्रवाशांकडून समाज माध्यमांवर छायाचित्रे, चित्रफिती टाकून प्रवाशांचे हाल दाखविण्यात येत आहेत. पुण्यातील काही प्रवाशांनी, 'केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विमानतळावर येऊन पाहणी करावी,' अशी मागणी केली.

लवकरच कोलमडलेली विमानसेवा सुरळीत करण्यात येईल. पुणे विमानतळावरून 'इंडिगो'ने शनिवारी ४२ विमानांची सेवा रद्द केली. त्यामध्ये विविध राज्यांत जाणाऱ्या २८ आणि येणाऱ्या १४ विमानांचा समावेश होता. आयत्या वेळी विमाने रद्द होत असल्याने प्रवाशांना विमानतळावर ताटकळत बसावे लागले. दरम्यान, पुणे विमानतळावर अकासा एअरलाइन्स, स्पाइस जेट, एअर इंडिया आदी कंपन्यांची उड्डाणे वेळेत सुरू असल्याचे विमानतळ प्रशासनाकडून सांगण्यात आले. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डीजीसीए) सूचनांनुसार इंडिगो कंपनीने पुणे विमानतळावरून दिवसभरात रद्द झालेल्या विमानांची यादी अगोदरच जाहीर केली. तसेच, प्रवाशांचे तिकीट शुल्क थेट बँक खात्यात ऑनलाइन पाठविण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. रद्द झालेल्या विमानसेवेबद्दल परिपत्रक काढून कंपनीने खेद व्यक्त केला. बँकॉकसह दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, लखनौ, गोवा, बेंगळुरू, तिरुअनंतपुरम, नागपूर, वाराणसी, चेन्नई, अमृतसर, अहमदाबाद या ठिकाणी जाणारी इंडिगोची विमाने रद्द झाली. त्याचबरोबर इतर राज्यांतून पुण्यात येणारी सात विमाने रद्द झाल्याचे कंपनीकडून जाहीर करण्यात आले. दिवसभरात इंडिगोच्या सात विमानांची उड्डाणे विलंबाने झाली. त्यामुळे विमानतळावर प्रवाशांची गर्दी कायम होती. आठ ते दहा तासांच्या विलंबामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला.

# ऑक्सिजन पार्क परिसरात युवकाचा खून

## चंदननगरमधील टोळक्याच्या हल्ल्यात युवकाचा मित्र जखमी

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वैमनस्यातून एका युवकावर चाकूने वार करुन खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना चंदननगर भागातील राजमाता जिजाऊ ऑक्सिजन पार्क परिसरात शनिवारी सायंकाळी घडली. हल्लेखोरांनी युवकाबरोबर असलेल्या एका मित्रावर वार केले. ही घटना उघडकीस आल्यानंतर चंदननगर भागात घबराट उडाली.**




लखन बाळू सकट (वय १८, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत, चंदननगर) असे खून झालेल्याचे नाव आहे. टोळक्याने केलेल्या हल्ल्यात सकटचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. पसार झालेल्या हल्लेखोरांचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती चंदननगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे यांनी दिली. वाघमारे आणि त्याचा मित्र शनिवारी सायंकाळी सातच्या सुमारास चंदननगरमधील राजमाता जिजाऊ ऑक्सिजन पार्क परिसरात थांबले होते. त्यावेळी हल्लेखोर तेथे आले. हल्लेखोरांनी सकट आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्रांना शिवीगाळ केली.

दोघांना मारहाण केली. त्यानंतर सकटवर चाकूने वार केले. हल्लेखोरांनी सकट याच्याबरोबर असलेल्या मित्रावर चाकूने वार केले. या घटनेची माहिती मिळताच चंदननगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या सकटआणि मित्राला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान सकटचा मृत्यू झाला. असून, वैमनस्यातून खून करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### चंदननगर भागात घबराट

वैमनस्यातून एका युवकावर चाकूने वार करुन खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना चंदननगर भागातील राजमाता जिजाऊ ऑक्सिजन पार्क परिसरात शनिवारी सायंकाळी घडली. हल्लेखोरांनी युवकाबरोबर असलेल्या एका मित्रावर वार केले. ही घटना उघडकीस आल्यानंतर चंदननगर भागात घबराट उडाली. लखन बाळू सकट असे खून झालेल्याचे नाव आहे. टोळक्याने केलेल्या हल्ल्यात सकटचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. पसार झालेल्या हल्लेखोरांचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती चंदननगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे यांनी दिली.

सेवा विकास बँकेचा | बँक परवाना रद्द झाल्यानंतर

# तब्बल चार वर्षानंतर सर्वसाधारण सभा!

## सभासदांनी आयोजित केली सर्वसाधारण सभा

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दि. सेवा विकास कॉ-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड पिंपरी मध्ये २०२१ नंतर सुरू झालेल्या प्रशासकीय घोटाळ्यांमुळे बँकेवर मोठे संकट ओढावले होते. कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांच्याकडून बँकेच्या सभासदांनी सध्याच्या परिस्थितीची माहिती घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण प्रकरणाचा पाठपुरावा करणारे सभासद, खातेधारक, कर्मचारी व ठेवीदार यांच्या वतीने रिजर्व बँकेने रद्द केलेला परवाना पुन्हा सुरु करावा, बँक पूर्ववत सुरु करणे, तीन वर्षांचे थकीत वेतन देऊन कर्मचाऱ्यांना पूर्ववत कामावर घेणे, ठेवीदार व खातेदार यांचे पैसे परत करणे इत्यादी विषयांवर हीं सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली आहे..**




रविवार, ७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२:३० ते २:३० या वेळेत संत तुकाराम महाराज पुतळा सभा मंडप, संत तुकाराम नगर,पिंपरी येथे ही सभा होणार आहे. सर्वसाधारण सभेस बँकेचे सभासद, बँक कर्मचारी, ठेवीदार, बँकेचे खातेदार व ग्राहक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कामगार नेते यशवंत भोसले यांनी केले आहे.

दि. सेवा विकास सहकारी बँक पिंपरीचा परवाना रद्द करण्याचा निर्णय आरबीआयने २०२२ साली घेतल्यानंतर २०५ कर्मचाऱ्यांची सेवाबंदी करण्यात आली होती. यानंतर प्रशासकीय प्रक्रियेतील गंभीर त्रुटी, कामगारांचा प्रलंबित वेतन प्रश्न, तसेच बँकेचे कामकाज थांबविण्याच्या आदेशासंदर्भात अनेक तक्रारी राज्य शासनाकडे दाखल झाल्या.

कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करीत विविध स्तरांवर तक्रारी मांडल्यामुळे प्रकरण पुन्हा गतीमान झाले आहे. शुक्रवारी झालेल्या बँकेच्या तपासणी दरम्यान लिक्विडेटर गैरहजर असल्यामुळे व कामगार आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार बँकेच्या लिक्विडेटरांनी अनेक विषयांवर समाधानकारक उत्तर न दिल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. बँकेचे वेतन, पूर्वीप्रमाणे कामगारांची पुनर्बांधणी, ठेवीदार व खातेदारांचे प्रलंबित आर्थिक हक्क यांसारख्या महत्त्वाच्या मुद्यांसाठी सभासदांनी संयुक्तरीत्या निर्णय घेण्याचा उद्देश या सभेमागे आहे.

### वेतन व ठेवीदार हक्कांसाठी सभासदांना आवाहन

सेवा विकास सहकारी बँक, पिंपरीचा परवाना २०२२ मध्ये रद्द झाल्याने २०५ कर्मचाऱ्यांची सेवाबंदी करण्यात आली होती. यानंतर वेतन थकबाकीसह विविध तक्रारी राज्य शासनाकडे दाखल झाल्या. कामगार नेते यशवंत भोसले यांच्या पाठपुराव्यामुळे तपासणी प्रक्रिया गतीमान झाली असून, अलीकडील तपासणीवेळी लिक्विडेटर गैरहजर राहिल्याने अनेक त्रुटींवर ठपका ठेवण्यात आला. वेतन, कामगारांची पुनर्बांधणी व ठेवीदारांचे हक्क या महत्त्वाच्या निर्णयांसाठी सर्व सभासद, कर्मचारी व ग्राहकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# किवळे-काळेवाडी मार्गासाठी मेट्रोचा डीपीआर तयार करा

## खासदार श्रीरंग बारणे यांचे केंद्रीय मंत्र्यांना साकडे

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**औद्योगिकनगरी म्हणून वेगाने विस्तारत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस बिकट होत आहे. शहरातील लोकसंख्या वाढ, वाहनांचा वाढता ताफा आणि अपुऱ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमुळे नागरिकांना दररोज तासन्तास कोंडीत अडकून प्रवास करावा लागतो.**

या पार्श्वभूमीवर शहरातील मेट्रो मार्गाचे जाळे वाढविणे अत्यावश्यक असल्याचे सांगत, किवळे–रावेत–डांगे चौक–काळेवाडी–जगताप डेअरी ते चतु:श्रृंगी असा नवीन मेट्रो मार्ग प्रस्तावित करून त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची मागणी शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

खासदार बारणे यांनी गुरुवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय शहरी विकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडीची भीषणता आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्यांची माहिती सविस्तरपणे मांडली. वाढत्या शहरासाठी भविष्यकालीन वाहतूक नियोजन आवश्यक असल्याचे सांगत नवीन मेट्रो मार्गासाठी डीपीआर तयार करण्यास तातडीची मंजुरी द्यावी, असे निवेदन त्यांनी खट्टर यांना हस्तांतरित केले.

निवेदनात खासदार बारणे यांनी नमूद केले आहे की, पुणे आणि पिंपरी-चिंचवड हे भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणारे शहरी क्षेत्र म्हणून ओळखले जातात. गेल्या काही वर्षांत शहरातील लोकसंख्या आणि खासगी वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. यामुळे महामार्ग, मुख्य रस्ते तसेच अंतर्गत वाहतुकीवर प्रचंड ताण वाढला असून, पर्यावरणासहित आर्थिक हानीही होत आहे. या परिस्थितीवर नियंत्रण आणण्यासाठी कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक हा एकमेव शाश्वत पर्याय असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

किवळे, रावेत, डांगे चौक, काळेवाडी ते जगताप डेअरी हा परिसर मागील दशकात मोठ्या प्रमाणात विकसित झाला आहे. गृहनिर्माण प्रकल्पांचा विस्तार, आयटी कंपन्यांची वाढ आणि औद्योगिक क्षेत्राशी वाढलेली



जोडणी यामुळे या भागातून पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. प्रस्तावित मेट्रो मार्ग कार्यान्वित झाल्यास नागरिकांना सुरक्षित, कमी वेळेत आणि स्वस्त प्रवासाची सुविधा मिळेल. तसेच पुणे–पिंपरी चिंचवड शहरांतील वाहतूक कोंडी कमी होऊन प्रदूषणातही घट होण्यास मदत होईल, असे खासदार बारणे यांनी नमूद केले.

या मेट्रो मार्गाच्या डीपीआरला केंद्राकडून हिरवा कंदील मिळाल्यास, शहराच्या वाहतूक व्यवस्थेच्या विस्तारासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरेल. आता केंद्र सरकार यावर काय निर्णय घेते याकडे पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.



## भूमिका

**आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढल्या आहेत. लोकसंख्या वाढली आहे. त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे. बेरोजगारी वाढल्यामुळे स्पर्धा वाढल्या आहेत. स्पर्धा वाढल्यामुळे शिक्षण घेत असलेल्या शाळकरी मुलांमध्ये वाढत असलेली गुणांची स्पर्धा चिंतेचा विषय ठरत आहे. खरतर जीवन जगतांना प्रत्येक माणसाला यश अपयश येणारच. यश-अपयश, जय-पराजय ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.**

# शिक्षणात ‘धाक नवे जिव्हाळा हवा!



जीवनात यश आले की माणूस आनंदी होतो व अपयश आले की माणूस दुःखी होतो. काही माणसे दुःखात खचून जातात. ते नैराश्यामुळे जीवनात काही उरत नसल्याचे समजत आत्महत्या म्हणजे काय हेही ज्या वयात कळत नाही ती लहान-लहान कोमल मुले आज आत्महत्या करून आपले जीवन अर्ध्यावरती सोडून जीवनयात्रा संपवत असल्याचे चित्र आज आसपासच्या परिसरात दिसून येत आहे. आज बालकांमध्ये नैराश्य पसरलेले दिसून येते. आज लहान मुले आत्महत्तेस प्रवृत्त होताना दिसतात. अनाठाई अपेक्षांचे ओझे त्यांच्या मानगुटीवर असल्यामुळे त्यांच्यातील बालपण खरतर हरवून गेले आहे. यश अपयशाचा सामना करतांना ती थकून जातात.

पालकही आज आपल्या मुलांना तुला इतके गुण मिळाले, इतके मिळाले पाहिजे होते, ये तू या क्षेत्रात जायला पाहिजे, तू हे बनले पाहिजे, तू ते बनले पाहिजे, तू हे केले पाहिजे, तू ते केले पाहिजे. आज पालक मुलांकडून प्रमाणापेक्षा जास्त अपेक्षा व्यक्त करू लागले आहे. पालक अनेक अपेक्षा आपल्या मुलांवर त्यांच्या क्षमता लक्षात न घेता त्यांच्यावर लादतात. मुलांकडून अपेक्षा करू नये असे ही नाही परंतु त्यांची क्षमता लक्षात घ्यायला हवे. अपयशाने खचून जाऊन हे बालमन आत्महत्या करतात. काही पालक मुलांना मारून, मुटकून, दाम-दाटून, दबाव आणून हवे ते प्रयत्न करायला लावतात. त्यातून मुलं कधी कधी नापास होतात, तर काही वेळा अभ्यास न केल्याने, तर कधी कधी अभ्यासापेक्षा जास्त टुकाऱ्या केल्याने तो नापास होऊ शकतो. परंतु नापास झाला म्हणजे सर्व संपले असे नाही ना! सततच्या शारीरिक व मानसिक ताणामुळे लहान मुले मानसिक दृष्ट्या खचून जातात. ती एकलपोटी बनतात. मुले कोणाशी बोलत नाही. शाळेत देखील मुले एकाकी पडतात. त्यांना आयुष्यात काही आनंद उत्साह आहे, हेच पटत नाही. अशा पालकांनी मुलांना वेळीच समजून घेतले पाहिजे. त्यांच्याशी संवाद वाढवायला पाहिजे. नाहीतर मुलांचा एक्कलकोंडेपणा त्यांना खायला उठतो आणि त्यातच ही मुले काही बरं वाईट करून घेण्याची अर्थात आत्महत्या करण्याची शक्यता वाढते.“राईस प्लेट तयार आहे? अशी पाटी रेस्टॉरंट वरती लावलेली असते. आपण आत जायचं एक राईस प्लेट ऑर्डर केली की गरमागरम प्लेट तयार. आपण मस्त आस्वाद घ्यायचा. राईस प्लेटचं ठिकं आहे हो.... पण आजच्या स्मार्ट युगात जिथे एका क्लिकवरती जगभरातील कोणतीही माहीती हजर होते, तिथे विद्यार्थ्यांना वाटतं की यश ज्याला आपण सक्सेस म्हणतो ते पण असंच एका ऑर्डर वा क्लिकवरती मिळावं. त्यासाठी पेलावा लागणारा संघर्ष आणि झटण्याची वृत्ती मुलांमधे कमी होत चालली आहे. म्हणूनच आपण अपयशी होत आहोत हे जाणवलं ही ते पचविण्याची क्षमता त्यांच्यात नसते किंवा रूजवली जात नाही. धाक हा नैतिक असावा पण सोबतच पाठीवर हात आहे हा विश्वास म्हणजे जिव्हाळा पण असावा. जी प्रक्रीया वर्षभर चालणारी आहे त्यासाठी परीक्षा तोंडावर आली असतांना दबाव टाकून काहीही साध्य होऊ शकत नाही. पालक जसे यशाचे दिलखुलास साथीदार होतात तसे त्यांनी अपयशाचे अजून खंबीर साथीदार व्हायला हवे. आपण जसं अन्न शिजवतो ना, त्याचा कणं अन् कणं उकळतो तेव्हा त्याला चव येते. आयुष्याचंही तसचं आहे. आयुष्याही शिजवतं ठेवावं लागतं, त्याचा क्षण अन् क्षण उकळावा लागतो. तेव्हा त्याला चव येते. हे संस्कार आपण मुलांवरती करायला हवे”, असे तज्ञ मार्गदर्शन पहल इन्स्टिट्युट बुलढाणाचे संचालक निखिल श्रीवास्तव यांनी केले आहे. आज आपल्या समाजात विभक्त कुटुंब पद्धत रुजत आहे. त्यामुळे लहान मुलांकडे पालकांचे दुर्लक्ष होते. काही पालक आपल्या मुलांना वेळ देत नाही. मुलांना नेमके जेव्हा संभाषणाची, संवादाची आवश्यकता असते नेमके तेव्हाच पालकांची साथ मिळत नाही. म्हणून पालकांनी नेहमी आपल्या मुलांसोबत संभाषण, संवाद साधायला हवे. आपल्या मुलांना काय आवडते? काय आवडत नाही? कोणत्या गोष्टीत मुलांना रुची आहे? कोणता विषय मुलांना अवघड जातो? मुलांना कोणती मदत हवी आहे?

## प्रासंगिक »

# व्हावा तो सोहळा

***आपल्या देशात काही वर्षांनी वृद्धांची संख्या, जगण्यातली आव्हाने आणखी वाढतील तेव्हा स्वेच्छामरणाचा पर्याय असायला हवा***

मृत्यू हेच माणसाच्या जीवनातील एकमेव सत्य आहे. पण तो कधी, कसा आणि कुठे येईल हे माहीत नसणे हे त्यातील सौंदर्य. त्यामुळेच जगण्यासाठी अवघ्या जिवाचा आटापिटा करणाऱ्यासमोर तो दत्त म्हणून उभा राहतो आणि त्याची याचना करणाऱ्याला हुलकावण्या देत राहतो. त्यामुळे त्याचे काय करायचे हे कोणालाच समजत नाही. तसेही मृत्यूचे काय करायचे, मुळात जन्म घेणेच कोणाच्या हातात नसेल तर मृत्यू तरी का असावा? जीवन कोणी तरी दिले असेल, तर मृत्यूही तोच देईल. ते संपवण्याचा अधिकार नैतिकदृष्ट्या कोणालाच असू शकत नाही, हा एक मतप्रवाह. वेगवेगळ्या धर्मांनीही त्याला दुजोरा दिला आहे. तर वादे वादे जायते तत्त्वबोध: करत दुसरा प्रवाह नेमके विरुद्ध सांगून जातो. त्याच्या मते, जन्म घेणे कोणाच्या हातात नसले, तरी जगणे हे लोढणे झाले असेल, तर निदान मृत्यू तरी त्या व्यक्तीच्या हातात असावा. वेदना सहन करत, कोणावर तरी भार होऊन जगण्यापेक्षा एखाद्याला मृत्यूला आपलेसे करावेसे वाटले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यासाठी मुंबईतील दादर चैत्यभूमी स्मारकावर लाखो अनुयायी दरवर्षी ६ डिसेंबर रोजी येतात. बाबासाहेबांचा प्रत्येक अनुयायी चैत्यभूमीवरुन परतताना त्यांचे विचार, कार्य आणि संदेश पुस्तिकेच्या स्वरुपात आपल्या ओंजळीत घेऊन जातो.

# भीम-सागराला महापालिकेची मानवंदना!

अरबी समुद्राची अथांगता आणि चैत्यभूमीहून मिळणारे डॉ. बाबासाहेब यांचे अक्षय विचार गाठीशी घेऊन हे अनुयायी श्रद्धामय आणि ज्ञानमय होवऊन परततात.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाले. मुंबईतील दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर डॉ. बाबासाहेबांवर दुसऱ्या दिवशी- ७ डिसेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले, तेव्हा तेथे उपस्थित दहा लाख अनुयायी भावनाविवश झाले होते. तेव्हापासून आजतागायत दरवर्षीच्या महापरिनिर्वाण दिनी, मुंबई भीमसैनिकांचे स्वागत करते आहे. चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांना प्रत्येक वर्षी सर्व नागरी सेवा सुविधा मिळाव्यात आणि चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसरातील रहिवासी, मैदानावर सरावासाठी येणारे खेळाडू, दादरमधील व्यावसायिकांनाही त्रास होणार नाही, याची खबरदारी बृहन्मुंबई महानगरपालिका घेत असते. महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या



सुविधांचे हे पर्व कुठून, केव्हा आणि कसे सुरू झाले हे जाणून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिवर्षी लाखो अनुयायी चैत्यभूमीवर येतात. जसजशी चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांची संख्या वाढत गेली, तसतशी सेवा-सुविधांमध्येही वाढ होत गेली. बाबासाहेबांवरील श्रद्धेने लाखोंच्या संख्येने येणाऱ्या अनुयायांना सुविधा पुरवताना चैत्यभूमी, दादर परिसरातील रहिवाशांच्या रोजच्या कामकाजात व्यत्यय येणार नाही, याचीही काळजी महानगरपालिका प्रशासन दरवर्षी घेत असते. किंबहुना अनुयायांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि स्थानिकांचे सुरळीत जनजीवन यातील सुवर्णमध्य साधण्यासाठी महानगरपालिका सातत्याने प्रयत्न करीत आली आहे.चैत्यभूमीशी सन १९५६ नंतर प्रत्येकाचे एक वेगळे नाते निर्माण होत गेले. अनेकांसाठी चैत्यभूमी म्हणजेच बाबासाहेब. कधीकाळी आजोबांचे बोट धरून चैत्यभूमीवर येणारा नातू काही वर्षांनंतर नव्या पिढीसह येथे येवू लागला. आता तर त्याच्या नंतरची उगवती पिढीही चैत्यभूमीची वाट धरू लागली आहे. देशभरात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे विचारांच्या प्रवाहाचे संक्रमण होऊ लागले आणि हा प्रवाह काही कालावधीनंतर खूप मोठ्या जनसागरात रुपांतरीत होत गेला.कालांतराने अनुयायी, डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथसंपदेचा अभ्यास करणारे अभ्यासक, जाणकार, युवक, विद्यार्थी, परदेशातील अभ्यासक या जनसागरास मिळत गेले. साहजिकच या जनसागरासाठी निवारा, पिण्याचे पाणी, भोजन, निवाऱ्यांची सोय करण्यावर एकमत झाले. मुंबईची पालकसंस्था या नात्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून त्यासाठीचे नियोजन करण्यात आले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## लाडक्या बहिणींना 3 हजार मिळणार
## डिसेंबरमध्ये खात्यात होणार रक्कम जमा

# लाडक्या बहिणींना 3000 मिळणार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यामध्ये महायुती सरकार पुन्हा एकदा स्थापन होऊन वर्षपूर्ती झाली. महायुतीकडून पुन्हा एकदा सरकार स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात आला. महायुतीचा प्रचार हा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला केंद्रस्थानी ठेऊन होता. प्रचारावेळी प्रत्येक महिलेला दरमहिन्याला 3 हजार रुपये दिले जातील असा दावा केला जात होता. मात्र प्रत्यक्षात सरकार आल्यानंतर एक वर्ष होऊनही ही रक्कम वाढवण्यात आलेली नाही. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी वक्तव्य केले.**

### मंत्री आदिती तटकरे यांची माहिती



महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वपूर्ण वक्तव्य केले आहे. यंदाच्या महिन्यामध्ये महिलांच्या खात्यामध्ये तीन हजार रुपये जमा होणार असल्याची आनंदाची बातमी आदिती तटकरे दिली आहे. यंदा पात्र लाडक्या बहिणींच्या खात्यात एक सोडून दोन हप्ते जमा होतील. त्यांच्या बँक खात्यात नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन्ही महिन्याचे पैसे जमा होतील. बँक खात्यात 1500 रुपये नाही तर 3000 रुपये जमा होतील. यामुळे लाडक्या बहिणींमध्ये एकच उत्साह निर्माण झाला आहे. डिसेंबर महिन्याची सुरुवात झाली आहे. मात्र लाडक्या बहिणींना अद्याप नोव्हेंबर महिन्याचा हप्ता मिळालेला नाही. माध्यमातील काही वृत्तानुसार, यावेळी नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचे दोन्ही हप्ते बँक खात्यात जमा होणार आहे. असे झाले तर लाडक्या बहिणींच्या खात्यात सरकार 3000 रुपये जमा करेल. अनेकांना नोव्हेंबर महिन्याचा हप्ता का जमा करण्यात आला नाही याबाबत संशय निर्माण झाला आहे. मात्र या सर्व महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचा हप्ता जमा होईल असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची रणधुमाळी सुरु आहे. पहिल्या टप्प्यामध्ये नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या मतदान पार पडले. तर दुसऱ्या टप्प्यामध्ये महापालिकेच्या निवडणूका होणार आहे. येत्या 21 डिसेंबर रोजी निकाल हाती लागणार आहे. मुळेच बहिणींच्या खात्यात रक्कम जमा झाली नाही. यापूर्वी गेल्यावर्षी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत लाभार्थ्यांच्या खात्यात एकाचवेळी दोन महिन्यांची रक्कम जमा झाली होती. त्यावेळी महिलांना एकदाच 3,000 रुपये मिळाले होते. एका अंदाजानुसार पुढील आठवड्यात सरकार लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याची शक्यता आहे. अद्याप सरकारने याविषयीची कोणताही अधिकृत घोषणा केलेली नाही.राज्यामध्ये महायुती सरकार पुन्हा एकदा स्थापन होऊन वर्षपूर्ती झाली. महायुतीकडून पुन्हा एकदा सरकार स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात आला. महायुतीचा प्रचार हा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला केंद्रस्थानी ठेऊन होता. प्रचारावेळी प्रत्येक महिलेला दरमहिन्याला 3 हजार रुपये दिले जातील असा दावा केला जात होता. मात्र प्रत्यक्षात सरकार आल्यानंतर एक वर्ष होऊनही ही रक्कम वाढवण्यात आलेली नाही. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी वक्तव्य केले. महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वपूर्ण वक्तव्य केले आहे. यंदाच्या महिन्यामध्ये महिलांच्या खात्यामध्ये तीन हजार रुपये जमा होणार असल्याची आनंदाची बातमी आदिती तटकरे दिली आहे. यंदा पात्र लाडक्या बहिणींच्या खात्यात एक सोडून दोन हप्ते जमा होतील. त्यांच्या बँक खात्यात नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन्ही महिन्याचे पैसे जमा होतील. बँक खात्यात 1500 रुपये नाही तर 3000 रुपये जमा होतील. यामुळे लाडक्या बहिणींमध्ये एकच उत्साह निर्माण झाला आहे. डिसेंबर महिन्याची सुरुवात झाली आहे. मात्र लाडक्या बहिणींना अद्याप नोव्हेंबर महिन्याचा हप्ता मिळालेला नाही. माध्यमातील काही वृत्तानुसार, आणि डिसेबर महिन्याचे दोन्ही हप्ते बँक खात्यात जमा होणार आहे.

### दोन महिन्यांचा हप्ता जमा होईल

लाडक्या बहिणींच्या खात्यात सरकार 3000 रुपये जमा करेल. अनेकांना नोव्हेंबर महिन्याचा हप्ता का जमा करण्यात आला नाही याबाबत संशय निर्माण झाला आहे. मात्र या सर्व महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचा हप्ता जमा होईल असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची रणधुमाळी सुरु आहे.

# राज्यात विकासकामे गतिमान पद्धतीने सुरू
## राज्यात शक्तिपीठ महामार्ग उभारण्याचा निर्णय झाला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासकामे गतिमान पद्धतीने सुरू आहेत. तर केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांतून राज्यात मोठ्या प्रमाणात प्रकल्प राबवले जात आहेत. अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी चव्हाण यांनी राज्य सरकारच्या मागील एक वर्षातील विकासकामांचा आढावा घेतला.**

रवींद्र चव्हाण (RAVINDRA CHAVAN) म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हिताच्या निर्णयांना प्राधान्य देऊन पुढील पाच वर्षे कृषी क्षेत्रात काम केले जाणार आहे. शेतकऱ्यांना ३२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मदत वितरित करण्यात आली असून सौर ऊर्जा निर्मितीद्वारे वीजपुरवठा सुधारण्याचे काम राज्याने केले आहे. मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा देणे, “नमो सन्मान” योजनेतून लाभ देणे, जलयुक्त शिवार २ आणि नदी जोड प्रकल्प हे महत्त्वाचे निर्णय असल्याचे त्यांनी सांगितले. विकासकामांबाबत बोलताना रवींद्र चव्हाण म्हणाले की, राज्यात शक्तिपीठ महामार्ग उभारण्याचा निर्णय झाला आहे. वाढवण



बंदरात १० लाखांहून अधिक रोजगार निर्माण होणार असून तेथे विमानतळ उभारले जाणार आहे. २३८ नवीन स्थानिक रेल्वेगाड्या खरेदी करण्याचा निर्णय, नागपूर लिंक रोडसाठी १३ हजार कोटींची मंजुरी, १०० गावांमध्ये सौर ग्राम योजना यांसारखे प्रकल्प राबवले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच महिला सक्षमीकरणाच्या दिशेने लाडकी बहीण योजना (LADKI BAHIN YOJNA) यशस्वीपणे सुरू असल्याचे सांगून, राज्यात महिलांसाठी मॉल उभारण्याची योजना कार्यान्वित होणार आहे. तसेच, नवी मुंबईत एज्युकेशन सिटी उभारली जाणार असून परदेशी विद्यापीठे तेथे येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. शालेय शिक्षणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा समावेश, अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यासाठी निधी, महिलांसाठी स्टार्टअपला प्रोत्साहन, व्हॉट्सॲपवर दाखले उपलब्ध करणे, आणीबाणी काळातील कारावास भोगलेल्या व्यक्तींना मानधन वाढवणे, ओबीसीसाठी ७४ वसतिगृहांची निर्मिती अशा निर्णयांची माहिती त्यांनी दिली.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत बोलताना, काही निवडणुका पूर्ण, काही प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले.

### ७४ वसतिगृहांची निर्मिती

एकनाथ शिंदे यांच्याशी झालेल्या चर्चेत जुन्या विषयांवर पडदा टाकण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.पण कल्याण-डोंबिवलीतील अलीकडील राजकीय प्रवेशांवर अधिवेशन काळात चर्चा होणार असून, काही राजकीय प्रश्नांना उत्तर न देता ते पत्रकार परिषदेतून बाहेर पडले.

**भारतीय रेल्वेचा मोठा निर्णय** मेगा प्लॅन, पुढील 3 दिवस धावणार 89 स्पेशल ट्रेन्स

# विमान प्रवाशांना मिळणार दिलासा!

## 14 विशेष गाड्या चालवण्याची योजना




। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाढत्या प्रवाशांच्या संख्येला आणि विमान रद्दीकरणांना प्रतिसाद म्हणून, भारतीय रेल्वेने पुढील तीन दिवसांत 89 विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या 100 हून अधिक फेऱ्या चालवतील, ज्यामुळे मुंबई, दिल्ली, पुणे, हावडा आणि हैदराबाद सारख्या प्रमुख शहरांमध्ये प्रवाशांचा प्रवास सुलभ होईल. उत्तर रेल्वे (NER) दिल्ली आणि मुंबई दरम्यान सहा विशेष गाड्या चालवेल. या उपक्रमाचा उद्देश एकसंध प्रवास अनुभव प्रदान करणे आणि रेल्वे प्रवासाची वाढती मागणी पूर्ण करणे आहे.**

हिवाळा हंगाम आणि विमान रद्दीकरणामुळे वाढत्या प्रवाशांच्या संख्येला लक्षात घेता, भारतीय रेल्वेने प्रवाशांना दिलासा देण्यासाठी सज्ज झाले आहे. आजपासून, पुढील तीन दिवसांत, देशभरात 89 विशेष गाड्या चालवल्या जातील, ज्या 100 हून अधिक फेऱ्या करतील. या गाड्यांचा प्राथमिक उद्देश मुंबई, दिल्ली, पुणे, हावडा आणि हैदराबाद सारख्या प्रमुख शहरांमध्ये प्रवाशांचा प्रवास सुलभ करणे आहे. उत्तर रेल्वे (NER) दिल्ली आणि मुंबई दरम्यान सहा विशेष गाड्या चालवेल, ज्यामुळे या दोन्ही शहरांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लक्षणीय सुविधा मिळेल. मध्य रेल्वेने प्रवाशांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी 14 विशेष गाड्या चालवण्याची योजना आखली आहे. यामध्ये रेल्वे क्रमांक 014113/01414 पुणे-बेंगळुरू-पुणे यांचा समावेश आहे, जो 6 आणि 7 डिसेंबर रोजी धावेल. याशिवाय, ०१४०९/०१४१० पुणे-हजरत निजामुद्दीन-पुणे ही गाडी 7 आणि 9 डिसेंबर रोजी, 01019/01020 लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी)-मडगाव-एलटीटी 7 आणि 8 डिसेंबर रोजी, 010177/01078 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी)-हजरत निजामुद्दीन-सीएसएमटी 6 आणि 7 डिसेंबर रोजी, 010115/010116 एलटीटी-लखनऊ-एलटीटी 6 आणि 7 डिसेंबर रोजी, 01012/011011 नागपूर-सीएसएमटी-नागपूर 6 आणि 7 डिसेंबर रोजी, 05587/05588 गोरखपूर-एलटीटी-गोरखपूर 7 आणि 9 डिसेंबर रोजी आणि 08245/08246 बिलासपूर-एलटीटी-बिलासपूर 10 आणि 12 डिसेंबर. दक्षिण पूर्व रेल्वेने विशेष गाड्यांचेही आयोजन केले आहे. यामध्ये 08073/08074 संत्रागाची-येल्हांका-संत्रागाची यांचा समावेश आहे. 08073 ही 7 डिसेंबर रोजी संत्रागाची येथून निघेल आणि 08074 ही 9 डिसेंबर रोजी येलहंका येथून परत येईल. 02870/02869 हावडा-सीएसएमटी-हावडा विशेष गाडी, 6 डिसेंबर रोजी हावडा येथून निघेल आणि 02869 8 डिसेंबर रोजी सीएसएमटी येथून निघेल. 07148/07149 चेरलापल्ली-शालीमार-चेरलापल्ली, 07148 6 डिसेंबर रोजी चेरलापल्ली येथून निघेल आणि 07149 8 डिसेंबर रोजी शालीमार येथून निघेल. प्रवाशांच्या अतिरिक्त गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी, दक्षिण मध्य रेल्वे आज, 6 डिसेंबर 2025 रोजी तीन विशेष गाड्या चालवत आहे. चेरलापल्ली ते शालीमार ट्रेन क्रमांक 07148, सिकंदराबाद ते चेन्नई एग्मोर ट्रेन क्रमांक 07146 आणि हैदराबाद ते मुंबई एलटीटी ट्रेन क्रमांक 07150 आज रवाना झाल्या आहेत. पूर्व रेल्वे हावडा, सियालदाह आणि प्रमुख ठिकाणांदरम्यान विशेष रेल्वे सेवा चालवणार आहे.

डिसेंबर दरम्यान दर बुधवार आणि शनिवारी भिवानी येथून धावेल. या गाडीचे एकूण 14 फेऱ्या होतील. ही गाडी दोन्ही दिशांना बोरिवली, पालघर, वापी, वलसाड, सुरत, भरुच, वडोदरा, रतलाम, मंदसौर, नीमच, चित्तोडगड, भिलवाडा, विजयनगर, नसीराबाद, अजमेर, किशनगड, जयपूर, गांधीनगर जयपूर, बांदिकुई, अलवर, रेवाडी, कोसली आणि चरखी दादरी स्टेशनवर थांबेल.

### गोरखपूरहून अतिरिक्त सेवा

शुक्रवार वगळता दररोज मुंबई सेंट्रलवरून धावेल. 9 ते 30 डिसेंबरपर्यंत बुधवार आणि शनिवार वगळता दररोज शकुर बस्तीवरून धावेल, एकूण 32 फेऱ्या होतील. बुकिंग 6 डिसेंबरपासून सुरू झाले आहे. ट्रेन क्रमांक 09730/09729 वांद्रे टर्मिनस-दुर्गापुरा सुपरफास्ट स्पेशल, 09730 ही 8 डिसेंबर रोजी वांद्रे टर्मिनसवरून आणि 09729 ही 7 डिसेंबर रोजी दुर्गापुराहून सुटेल.

# शेख हसीना भारतात किती काळ राहणार?

## हसीना जोपर्यंत इच्छिते तोपर्यंत राहू शकते : परराष्ट्र मंत्री जयशंकर



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**१७ नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी ढाका न्यायालयाबाहेर गर्दी जमली होती. माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरुद्धचा निकाल आधीच लागला असला तरी, बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने (ICT) मृत्युदंडाची शिक्षा जाहीर केली तेव्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. गेल्या वर्षी निदर्शनांचे नेतृत्व करणाऱ्या तरुणांनी मिठाई वाटली.**

एकमेकांना मिठी मारली आणि आपल्या देशवासीयांच्या हत्याकांडाचा आदेश दिल्याचा आरोप असलेल्या हसीनाला न्याय मिळावा म्हणून निकालाचे स्वागत केले. बांगलादेशचे संस्थापक वडील बंगबंधू शेख मुजीबुर रहमान यांची ७८ वर्षीय कन्या हसीना यांना त्यांच्या अनुपस्थितीत मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये दोषी ठरवण्यात आले. तत्कालीन गृहमंत्री असदुज्झमान खान यांनाही मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. निकाल ऐकताच वकील आणि पीडितांच्या कुटुंबीयांनी न्यायालयाच्या आत आनंद साजरा केला. १९७१ च्या स्वातंत्र्ययुद्धात पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्यांवर खटला चालवण्यासाठी हसीनाने आयसीटीची स्थापना केली हे विडंबनात्मक आहे. याचदरम्यान आत परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी बांगलादेशवर टीका केली आहे. भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी शनिवारी (6 डिसेंबर) बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे भारतात वास्तव्य वैयक्तिक निवड असल्याचे वर्णन केले. त्यांच्या भारतात येण्यामागील परिस्थितीचा त्यांच्या निर्णयावर परिणाम झाला. ७८ वर्षीय शेख हसीना गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये भारताला भेट दिली होती, जेव्हा बांगलादेशातील त्यांच्या १५ वर्षांच्या राजवटीचा शेवट हिंसाचारात झाला होता, ज्यामध्ये शेकडो लोक मृत्युमुखी पडले होते आणि हजारो लोक जखमी झाले होते. गेल्या महिन्यात, ढाका येथील एका विशेष न्यायालयाने त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. एक कार्यक्रमात सांगितले की, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी शेख हसीना यांच्या भारतातील दीर्घकालीन वास्तव्याबद्दल आणि भारत-बांगलादेश संबंधांवर विस्तृतपणे भाष्य केले. त्या या निर्णयात महत्त्वाचे घटक आहेत. जयशंकर म्हणाले, "ती एका अनोख्या परिस्थितीत येथे आली आणि मला वाटते की ती परिस्थिती स्पष्टपणे तिच्या पुढे काय घडते यात भूमिका बजावते

### संबंधांच्या भविष्याबद्दल आशावादी

परराष्ट्रमंत्र्यांनी असेही पुनरुच्चार केले की भारताने शेख हसीना यांना आश्वासन दिले आहे की ती जोपर्यंत इच्छिते तोपर्यंत भारतात राहू शकते. भारत सरकारने वारंवार सांगितले आहे की हसीनाला मानवतेच्या आधारावर आश्रय देण्यात आला आहे आणि तिच्या सुरक्षिततेची आणि कल्याणाची पूर्णपणे काळजी घेतली जात आहे.

# जानकी ऐश्वर्याचा खोटेपणा उघड करणार

‘घरोघरी मातीच्या चुली’ ही लोकप्रिय मालिकांपैकी एक आहे. जानकी व हृषिकेशची जोडी प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसते आहे. या मालिकेत सातत्याने नाट्यमय घडामोडी घडताना दिसतात. काही दिवसांपूर्वीच ऐश्वर्याच्या कट-कारस्थानामुळे जानकी व हृषिकेश हे घराबाहेर पडले आहेत. आता सारंगदेखील ऐश्वर्याच्या म्हणण्याप्रमाणे वागत असल्याचे दिसत आहे. तोदेखील इतरांना फसवून खोटे वागत असल्याचे पाहायला मिळत आहे. आता श्री व सौ या स्पर्धेत जानकी ऐश्वर्याचा खोटेपणा सर्वांसमोर उघड करणार असल्याचे पाहायला



मिळत आहे.स्टार प्रवाहने घरोघरी मातीच्या चुली या मालिकेचा एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये श्री व सौ ही स्पर्धा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. सारंग व ऐश्वर्या दोघांच्याही कानावर हेडफोन आहेत. त्यामध्ये मोठ्या आवाजात गाणी सुरू आहेत. सारंग जे सांगेल, ते ऐश्वर्याने ओठांच्या हालचालीवरून समजून ते वाक्य, तसेच मोठ्याने म्हणायचे आहे. ऐश्वर्याची एकापाठोपाठ सर्वच वाक्ये बरोबर आल्यानंतर तिथेच बसलेल्या जानकीला संशय येतो. ती हृषिकेशला म्हणते, “हेडफोन्समध्ये एवढ्या मोठ्याने म्युझिक सुरू असतानासुद्धा हिला सगळं कसं कळतं?” ऐश्वर्याचा खोटेपणा उघड करण्यासाठी ते ऐश्वर्याच्या वडिलांचे नाव घेते. वडिलांचे नाव ऐकताच ऐश्वर्या आनंदाने अरे डॅडा आले, असे म्हणत वळते.

# सालों साल पहले भी हुआ था, निष्फल रहा

बॉलिवूडचे सुपरस्टार अमिताभ बच्चन पुन्हा एकदा त्यांच्या अनोख्या पोस्टने चर्चेत आले आहेत. अमिताभ बच्चन हे अशा स्टार्सपैकी एक आहेत जे त्यांच्या गूढ पोस्टने लोकांना आश्चर्यचकित करतात किंवा त्यांच्या पोस्टचे अनेकदा डबल मीनिंग असतात असे दिसते. अलीकडेच, शनिवारी बिग बी यांनी फेसबुक आणि इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर असे काहीतरी पोस्ट केले ज्यामुळे चाहते आश्चर्यचकित झाले आणि म्हणाले, “हे देवा, डबल मीनिंग अर्थ काढला गेल्याचे दिसत आहे.अमिताभ बच्चन हे त्यांच्या अनोख्या पोस्टसाठी प्रसिद्ध असतात, बऱ्याचदा त्यांचा खरा अर्थ फक्त त्यांनाच माहित असतो. तसेच, बिग बींनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, एक्स आणि फेसबुकवर विविध पोस्ट शेअर केल्या आहेत. बिग बी यांनी त्यांच्या फेसबुक पेजवर पोस्ट करत लिहिले,’अमां यार, जाने दो!! औजार अब सार व जनिक हो गया है!!!” त्यांनी असे का म्हटले हे स्पष्ट केले नाही. चाहत्यांनी त्यांच्या पद्धतीने पोस्टचा अर्थ लावण्यास सुरुवात केली आहे. अमिताभ बच्चन यांनीही त्यांच्या एक्स प्लॅटफॉर्मवर एक वेगळी पोस्ट केली. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, “सालों साल पहले भी हुआ था, निष्फल रहा, अभी यही होगा !! चाहत्यांना बिग बींची ही पोस्ट समजत नाही आणि ते त्यातून वेगवेगळे अर्थ काढत आहेत.

# अफेअर अन् लग्न

प्यार का पंचनामा’ फेम लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री सोनाली सेहगल आई होणार आहे. वर्षभरापूर्वी सोनालीने व्यावसायिक बॉयफ्रेंड आशीष सजनानीशी लग्न केलं. आता तिने गूड न्यूज दिली आहे. सोनालीने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट करून याबद्दल चाहत्यांना माहिती दिली आहे. ‘गोपी बहू’ म्हणजेच देवोलिना भट्टाचार्जीने प्रेग्नेंसीची घोषणा केली होती. आता एका दिवसानंतर बी-टाऊनची प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली सहगल हिने आनंदाची बातमी दिली आहे. लग्नाच्या एक वर्षानंतर सोनाली आई होणार आहे. ३५ वर्षीय सोनाली सहगलने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट घोषणा करून गूड न्यूज दिली आहे. तिने तीन फोटो शेअर केले आहेत, ज्यात एका फोटोमध्ये तिचा बेबी बंप दिसतोय आणि ती काहीतरी खाताना दिसत आहे. तर तिच्या शेजारी तिचा पती बिअरची बाटली आणि हातात एक बाळाच्या दुधाची बाटली धरलेला दिसत आहे.

अभिनेत्रीच्या समोर बेडवर चिप्स, बिस्किट व पुस्तकं दिसत आहेत.सोनालीने कॅप्शनमध्ये लिहिलं, “बिअरच्या बाटल्यांपासून बाळाच्या दुधाच्या बाटलीपर्यंत आशिषचे आयुष्य बदलणार आहे. माझ्या बाबतीत काही गोष्टी तशाच राहतील. आधी मी माझ्यासाठी खायचे आता दोघांसाठी खाते. दुसरीकडे समशेर (सोनालीचा श्वान) चांगला मोठा भाऊ होण्यासाठी नोट्स काढत आहे. मी खूप कृतज्ञ व आनंदी आहे. प्रार्थना करा.” सोनालीच्या बाळाचा जन्म डिसेंबरमध्ये होईल असंही तिने सांगितलं. सोनाली सहगलने ७ जून २०२३ रोजी बिझनेसमन आशिष सजनानीशी लग्न केलं. या जोडप्याने पाच वर्षे एकमेकांना गुपचूप डेट केलं होतं. त्यानंतर मुंबईत लग्नगाठ बांधली.प्यार का पंचनामा’ फेम लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री सोनाली सेहगल आई होणार आहे.



# सलमानने जवळून पाहिलेला मृत्यू

अभिनेता सलमान खानने नुकतीच डंब बिर्याणी या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. हे यूट्यूब चॅनेल सलमान खानच्या पुतण्याचे आहे. या पॉडकास्टमध्ये सलमान खानने विविध विषयांवर गप्पा मारल्या. तरुण पिढीला काही महत्त्वाचे सल्ले दिले. माणसामधील उत्साह सर्वांत महत्त्वाचा असतो, तो कधी संपला नाही पाहिजे. नाही तर तुम्ही वयाच्या आधी वृद्ध होता, असे म्हणत सलमान खानने त्याची मते व्यक्त केली. त्याबरोबरच या पॉडकास्टमध्ये सलमान खानने मृत्यू जवळून पाहिल्याचे म्हणत एक घटनादेखील सांगितली आहे.सलमान खानने डंब बिर्याणी या पॉडकास्टमध्ये एका पुरस्कार सोहळ्यानंतर श्रीलंकेतून परतताना काय घडले होते याबाबतचा किस्सा सांगितला. सलमान खानने म्हटले की, आयफा पुरस्कार सोहळा संपल्यानंतर श्रीलंकेतून विमानातून परत येत होतो. सगळे जण हसत होते, गप्पा चालू होत्या. अचानक विमानाच्या इंजिनाचा आवाज येऊ लागला. तो आवाज काही क्षणांसाठी नव्हता. तर ४५ मिनिटे विमानाच्या इंजिनाचा आवाज येत होता.



# मृण्मयीचा महिन्याचा खर्च माहितीये का?

अभिनेत्री मृण्मयी देशपांडे नुकतीच एक राधा एक मीरा या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. महेश मांजरेकर दिग्दर्शित या चित्रपटात मृण्मयी देशपांडेसह अभिनेता गश्मीर महाजनी व सुरभी भोसले प्रमुख भूमिका साकारत आहेत. या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. आता मात्र मृण्मयी देशपांडे वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. एका मुलाखतीत तिने तिचा महिन्याचा खर्च किती असतो, हे सांगितले आहे. अभिनेत्री मृण्मयी देशपांडे व तिचा पती स्वप्नील राव यांनी नुकताच आरपार या यूट्यूब चॅनेलशी संवाद साधला. त्यावेळी मृण्मयीने म्हटले की, शेतामध्ये आल्यानंतर आमचा जो आठवड्याचा खर्च आहे, तो जवळजवळ ५००-६०० रुपये आहे. महिन्यात आम्ही २००० रुपयांत आनंदात जगतो. गेल्या पाच वर्षांत मला आठवत नाही की, मी वारंवार कपडे विकत घेतले. माझा वर्षाचा कपड्यांचा खर्च जवळजवळ २० हजार रुपये असेल. माझ्या प्रोफेशनला हा खर्च नगण्य आहे. त्याव्यतिरिक्त मला काही लागतच नाही”, असे म्हणत अभिनेत्रीने तिचा महिन्याचा खर्च सांगितला आहे. याबरोबरच, त्यांनी त्यांच्या शेतीविषयीदेखील माहिती दिली. एकाचवेळी ते विविध प्रकारची उत्पादने घेत असल्याचे म्हटले. स्ट्रॉबेरीसह विविध इतर फळे, फळभाज्या, कांदा, झेंडू, माठ, लसून, मिरची अशी विविध उत्पादने घेत असल्याचे या जोडप्याने सांगितले. त्यांनी सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यास सुरूवात केली आहे.

## जयस्वालचे शानदार शतक! आफ्रिकेला पराभूत करत भारताचा मालिकेवर कब्जा

# विशाखापट्टणमध्ये ‘यशस्वी’ विजय!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताने ९ विकेट्स विजय मिळवला. या विजयासह भारताने मालिकेवर २-१ असा कब्जा केला आहे. या सामन्यात भारताने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तर दक्षिण आफ्रिका संघ प्रथम फलंदाजी करत २७० धावा उभ्या केल्या होत्या. भारताने यशस्वी जयस्वालच्या शतकाच्या जोरावर २७१ धावांचे लक्ष्य गाठले. भारताने ६१ चेंडू शिल्लक ठेवून विजय मिळवला.**

शेवटचा एकदिवसीय सामना विशाखापट्टणम येथील डॉ. वाय. एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. भारतीय संघाने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तर दक्षिण आफ्रिका संघ प्रथम फलंदाजी करण्यास मैदानात उतरला. दक्षिण आफ्रिकेने सलामीवीर क्विंटन डी कॉकच्या शतकाच्या जोरावर 270 धावा केल्या.क्विंटन डी कॉकने ८९ चेंडूत १०६ धावा काढल्या. या खेळीत ८ चौकार आणि ६ षटकार खेचले. क्विंटन डी कॉक व्यतिरिक्त कर्णधार टेम्बा बावुमाने देखील ४८ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. इतर फलंदाज मात्र आपली छाप पाडू शकले नाहीत. भारताकडून कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या. तर जडेजा आणि शर्दीप सिंग यांनी प्रत्येकी १ विकेट काढली.दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या ३७१ धावांचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाची सुरुवात दिमाखदार झाली. सलामीवीर रोहित शर्मा आणि यशस्वी जयस्वाल या जोडीने पहिल्या विकेट्ससाठी १५५ धावांची भागीदारी रचली. या दरम्यान यशस्वी आणि रोहित शर्मा यांनी अर्धशतके ठोकली. अर्धशतक केल्यानंतर चांगल्या फॉर्ममध्ये दिसणारा रोहित शर्मा ७५ धावा काढून बाद झाला. त्याने ७ चौकार आणि ३ षटकार लगावले. त्याला केशव महाराजने बाद केले. त्यानंतर यशस्वी आणि विराट कोहली यांनी डाव सांभाळला. दरम्यान यशस्वी जयस्वालने एकदिवसीय कारकीर्दीतील आपले पहिले शतक पूर्ण केले. यशस्वी जयस्वालने १११ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. तर दुसऱ्या बाजूने विराट कोहली शानदार फटकेबाजी करत होता. या दोघांनी ११६ धावांची अभेद्य भागीदारी रचत भारताला शानदार विजय मिळवून दिला. यशस्वी जयस्वालने १२१ चेंडूत नाबाद ११६ धावा केल्या. त्याने या खेळीत १२ चौकार आणि २ षटकार ठोकले. तर विराट कोहलीने या मालिकेतील सलग ३ रे अर्धशतक ठोकले. तो ४५ चेंडूत ६५ धावा करून नाबाद राहिला. या दरम्यान त्याने ६ चौकार आणि ३ षटकार लगावले. दक्षिण आफ्रिकेकडून केशव महाराजला एकमेव विकेट मिळाली.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताने ९ विकेट्स विजय मिळवला. या विजयासह भारताने मालिकेवर २-१ असा कब्जा केला आहे. या सामन्यात भारताने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तर दक्षिण आफ्रिका संघ प्रथम फलंदाजी करत २७० धावा उभ्या केल्या होत्या. भारताने यशस्वी जयस्वालच्या शतकाच्या जोरावर २७१ धावांचे लक्ष्य गाठले. भारताने ६१ चेंडू शिल्लक ठेवून विजय मिळवला. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात तिसरा आणि शेवटचा एकदिवसीय सामना विशाखापट्टणम येथील डॉ. वाय.एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. भारतीय संघाने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तर दक्षिण आफ्रिका संघ प्रथम फलंदाजी करण्यास मैदानात उतरला. दक्षिण आफ्रिकेने सलामीवीर क्विंटन डी कॉकच्या शतकाच्या जोरावर 270 धावा केल्या.क्विंटन डी कॉकने ८९ चेंडूत १०६ धावा काढल्या.

### कोहलीला प्लेअर ऑफ द सिरीज







### रोहित शर्माचा बिग शो!

या खेळीत ८ चौकार आणि ६ षटकार खेचले. क्विंटन डी कॉक व्यतिरिक्त कर्णधार टेम्बा बावुमाने देखील ४८ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. इतर फलंदाज मात्र आपली छाप पाडु शकले नाहीत. भारताकडून कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या. तर जडेजा आणि शर्दीप सिंग यांनी प्रत्येकी १ विकेट काढली.दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या ३७१ धावांचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाची सुरुवात दिमाखदार झाली.

# ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात 511 धावा

## तिसऱ्या दिवसाचा खेळ समाप्त; इंग्लंड 43 धावांनी पिछाडीवर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ॲशेस कसोटी मालिका सुरू आहे. या मालिकेतील दूसरा सामना ब्रिस्बेनमधील गाबा येथे खेळवण्यात येत आहे. या दिवस-रात्र कसोटीत सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत सर्वबाद ३३४ धावा केल्या होत्या.**



प्रतिउत्तरात ऑस्ट्रेलियाचा पहिल्या डावात सर्वबाद ५११ धावा करत १७७ धावांची आघाडी घेतली होती. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा इंग्लंडने ६ विकेट्स गमावून १३४ धावा केल्या होत्या. इंग्लंड संघ अजूनही ४३ धावांनी पिछाडीवर आहे.

तिसऱ्या दिवशी ६ बाद ३७८ वरुन ऑस्ट्रेलियाने पुढे आपला स्कोअर ५११ धावांपर्यंत पोहचवला आणि १७७ धावांची आघाडी घेतली. तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने गोलंदाजीसह आपल्या फलंदाजीने देखील प्रभावित केले.

त्याने तळाच्या फलंदाजांना साथीला घेत धावसंख्या पुढे नेली. स्टार्कने १४१ चेंडूत ७७ धावा केल्या आहेत. त्याने या खेळीत १३ चौकार लगावले. त्याआधी जेक वेदरलँडने ७२, मार्नस लॅबुशाने ६५, ॲलेक्स कॅरीने ६३ आणि स्टीव्ह स्मिथने ६१ धावा केल्या. इंग्लंडकडून ब्रायडन कार्सेने ४, बेन स्टोक्सने ३ आणि जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन आणि विल जॅक्सने प्रत्येकी १ बळी घेतला.ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ५११ धावा केल्या आणि इंग्लंडवर १७७ धावांची आघाडी घेतली. धावांचा पाठलाग करायाल उतरलेल्या इंग्लंड संघाने तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा सहा विकेट गमावून १३४ धावा केल्या होत्या आणि ४३ धावांनी पिछाडीवर आहे.

### इंग्लंडचा दूसरा डाव

इंग्लंडची दुसऱ्या डावाची सुरुवात चांगली झाली पण नंतर मात्र इंग्लंडचा डाव गडगडला. झॅक क्रॉलीआ आणि बेन डकेट या सलामीवीरांनी पहिल्या विकेट्ससाठी ४८ धावांची भागीदारी रचली. बेन डके १५ धावा करून बाद झाला.धावा आणि विल जॅक्स ४ धावांवर नाबाद आहेत. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्क, स्कॉट बोलँड आणि मायकेल नेसर यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।

। दि. 7 डिसेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मिशन PCMC : निवडणूक इच्छुकांची मागणी सरळ;

# आम्हाला हवे फक्त "कमळ"!

### मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयातून दोन दिवसांत 415 हून अधिक अर्जांचे वितरण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आगामी निवडणुकीचे बिगुल वाजले असून, आता भारतीय जनता पार्टीकडून उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांची झुंबड उडाली आहे. अवघ्या दोन दिवसांत पक्षाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयातून तब्बल 415 हून अधिक इच्छुक उमेदवारांचे अर्ज वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे या निवडणुकीत उमेदवारीसाठी इच्छुकांची सर्वाधिक पसंती 'कमळ' आहे, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**

भाजपा नेते आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपळे सौदागर येथे आढावा बैठक घेतली होती. त्यानंतर भाजपाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांनी पक्षाच्या कार्यालयातून अर्ज घ्यावेत. ते जमा करुन छाननी व पडताळणी करावी आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी प्रदेश कार्यालयाकडे पाठवावेत, अशा सूचना स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांना दिल्या होत्या. उद्या, रविवार, दि. 7 डिसेंबरपर्यंत इच्छुकांसाठी अर्ज पार्टी कार्यालयातून मिळण्याची मुदत आहे.

भाजपाचे संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे म्हणाले की, मोरवाडी- पिंपरी येथील भाजपाच्या मध्यवर्ती पक्ष कार्यालयामध्ये शुक्रवारी दुपारी इच्छुक अर्ज वितरणासाठी सुरूवात केली. अवघ्या दोन दिवसांत तब्बल 415 हून अधिक उमेदवारांनी अर्ज घेतले आहेत. उद्या शेवटचा दिवस आहे. ज्या मान्यवर इच्छुकांनी अर्ज घेणे अद्याप बाकी आहे. त्यांनी त्वरील अर्ज घ्यावेत.

किंबहुना, भारतीय जनता पार्टीमध्ये निवडणूक इच्छुक अर्ज वितरण, अर्ज स्विकारणे आणि त्यानंतर पक्षाच्या विविध स्तरावरील सर्व्हेचा आधार घेवून उमेदवारी निश्चित केली जाते. पक्षश्रेष्ठींचे या प्रक्रियेवर बारीक लक्ष असते. सर्वच इच्छुकांनी अर्ज पक्षाच्या कार्यातून घ्यावेत, असे आवाहनही शेडगे यांनी केले आहे.



"पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपाने "अब की बार 100 पार..." असा नारा दिला आहे. पक्ष शिष्टाचार- शिस्त आणि संघटन ही पक्षाची बलस्थाने आहेत. पक्षश्रेष्ठींच्या निर्देशानुसार, शहरातील 32 प्रभागांमधील इच्छुकांचे अर्ज पक्षाच्या कार्यालयात वितरणाचे काम सुरू आहे. इच्छकांनी आरक्षणनिहाय अर्ज घ्यावेत. शहरात 128 जागा आहेत. पण, इच्छुकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात झालेल्या विकासकामांवर व राष्ट्रहिताच्या निर्णयांमुळे भाजपावर लोकांचा विश्वास वृद्धींगत झाला आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही संघटन मजबूत केले असून, या निवडणुकीत पुन्हा एकदा विजयी पताका फडकवण्यासाठी आम्ही सज्ज झालो आहोत.

**-शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## प्रियदर्शनी स्कूलमध्ये संविधान प्रश्नमंजूषा स्पर्धा

### शिक्षण विश्व : संविधानाचे भान तरुण पिढीत रुजणे अत्यावश्यक – ॲड. कदाते

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**संविधान दिनानिमित्त प्रियदर्शनी स्कूल, मोशी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली संविधान प्रश्नमंजूषा स्पर्धा उत्साहात पार पडली. प्रियदर्शनी समूहाच्या विविध शाखांसह एकूण नऊ शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. इयत्ता ५ ते १० वीतील विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान, मूलभूत अधिकार, कर्तव्ये तसेच लोकशाहीची रचना याबाबतचे आपले ज्ञान प्रभावीपणे सादर केले.**




या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, नागरिकत्वाची जाणीव आणि लोकशाही जबाबदाऱ्यांविषयीची समज दृढ झाली. ज्ञान आणि चुरशीच्या या स्पर्धेत प्रियदर्शनी स्कूल, शिवाजीनगर शाखेने विजेतेपद पटकावले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सुप्रीम कोर्टातील प्रॅक्टिशनर ॲड. गीतांजली कदाते यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची रूपरेषा, महत्वाचे कायदे आणि नागरिकांच्या भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी भाषणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर आणि पालनाची भावना अधिक दृढ झाली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध ठरला असून संविधानाबद्दलची जाण वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचे आयोजकांनी सांगितले.

"भारतीय संविधान हे फक्त कायद्यांचे पुस्तक नसून आपल्या लोकशाहीचा आत्मा आहे. तरुण पिढीने त्यातील मूल्ये केवळ शिकणेच नव्हे, तर दैनंदिन आयुष्यात जगणे हेच आजच्या काळाचे खरे नागरिकत्व आहे."

**–ॲड. गीतांजली कदाते,** सर्वोच्च न्यायालय.

## श्रीक्षेत्र नारायणपूर येथे निस्वार्थ सेवेतून दत्त जयंती उत्सव!

# सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा साळुंके यांची भक्ती!

### दिपक साळुंके यांच्या पुढाकाराने महाप्रसाद सेवा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चऱ्होली बुद्रुक, कोतवालवाडी परिसरातील दत्तभक्तांनी यंदाची दत्त जयंती मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी केली. सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा साळुंके आणि त्यांचे पती दीपक साळुंके यांच्या पुढाकारातून गेल्या चार वर्षांपासून सुरू झालेला हा भक्तीपरंपरेचा उपक्रम यंदाही अधिक भक्तिभावाने संपन्न झाला. धार्मिक कार्यक्रमांची शृंखला, महाप्रसाद आणि भजन-कीर्तन यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.**







दीपक साळुंके यांनी सांगितले की, चार वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणपूर येथे श्री दत्त महाराजांचे दर्शन घेण्यापासून या उपक्रमाची प्रेरणा मिळाली. त्या दिवशी अनुभवलेल्या आध्यात्मिक शक्तीने दत्त जयंती दरवर्षी आयोजित करण्याचा मानस दृढ केला. त्यांच्या कार्यालयासमोर उगवलेला पवित्र औदुंबर वृक्ष हा भक्तीसाठी ऊर्जा आणि सकारात्मकतेचा सतत स्रोत असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

दत्त जयंतीनिमित्त पारायण, भजन-कीर्तन आणि महाप्रसाद या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गावातील सर्व वयोगटातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. महाप्रसादाच्या वेळी भाविकांची मोठी गर्दी उसळून संपूर्ण परिसर दर्शन आणि भक्तीने भारला. संपूर्ण आयोजनाची जबाबदारी साळुंके दाम्पत्यांनी स्वतः सांभाळली. यंदाच्या कार्यक्रमात सर्व जिवलग मित्रांनी दिलेला मोलाचा सहभाग, मार्गदर्शन आणि अखंड साथ याबद्दल साळुंके दाम्पत्यांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली. दत्त जयंतीचा हा उपक्रम भक्ती, प्रेम, सामाजिक ऐक्य आणि निस्वार्थ सेवाभाव यांचा सुंदर संगम ठरला. गावकऱ्यांच्या सहभागामुळे आणि साळुंके दाम्पत्यांच्या उत्साहपूर्ण नेतृत्वामुळे कार्यक्रम यंदाही अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

> "श्री क्षेत्र नारायणपूरमध्ये मिळालेल्या भक्तीच्या अनुभवाने मन अधिक निर्मळ होते; तिथून मिळणारी ऊर्जा आपल्याला निस्वार्थ सेवा आणि सत्कर्माच्या मार्गावर दृढ ठेवते."
> **-अनुराधा साळुंके,** सामाजिक कार्यकर्त्या.

## समता-स्वातंत्र्याच्या मूल्यांची अंमलबजावणीच खरे अभिवादन!

### अतिरिक्त आयुक्त सांडभोर ; भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या कार्य, विचार आणि योगदानाचा गौरव करताना भारतीय संविधानाने देशाला दिलेल्या समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांचे जतन व अंमलबजावणी करणे हेच खरे अभिवादन ठरेल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले.**



भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस तसेच भीमसृष्टी पिंपरी चौक, हिंदुस्थान अँटीबायोटीक्स कंपनी येथील पुतळ्यास महापालिकेच्या वतीने अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उप अभियंता आकाश ठोकळ, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश भुक्तर, मुकेश जगताप तसेच भीमसृष्टी येथील कार्यक्रमास माजी नगरसदस्य मारूती भापकर, सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब गायकवाड, एच. ए. कंपनी येथील कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते मिलींद जाधव, संजय केंगले, रविंद्र कांबळे, मधु फलके, रमेश जाधव, सुरेंद्र पासलकर, मारूती लोखंडे, मारूती बोरावके, सुनिल रिकामे उपस्थित होते.

दापोडी येथील कार्यक्रमात उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले यावेळी पोलीस उपनिरीक्षक राजीव भास्कर, माजी नगरसदस्या माई काटे, चंद्रकांता सोनकांबळे तसेच विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046